म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. ७७८

REFBK-0001702
REFBK-0001702

म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
नं. ७२९

"यशवंत"

समर्थ.

# माझा प्रिय मित्र

अर्थात्

## मित्र-प्रेम-रहस्य.

कवि-" यशवंत " चाफळ.

प्रकाशकः-श्रीमंत दादासाहेब ऊर्फ रामचंद्र
गंगाधर स्वामी चाफळकर,
चाफळ, जि. सात

REFBK-0001702
REFBK-0001702

मुद्रकः-अच्युत चिंतामण भट, यशवंत प्रेस;
३७ शनवार पेठ, पुणें.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. )

किंमत चार आणे.

श्रीराम समर्थ.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

"तारकानाथ आणि यशवंत" या नामद्वयानीं महाराष्ट्र-वाचकांच्या नुकतेच परिचयांत येत असलेले कवि नानासाहेब ऊर्फ यशवंत दिनकर पेंढरकर (चाफळ) यांनी प्रस्तुत काव्य एका वर्षापूर्वींच लिहिलें होतें. तें नुकतेंच आमच्या निदर्शनास आल्यावरून आज तें रसिकवृंदाचे भेटीस या रीतानें येत आहे.

काव्याचें नामाभिधान ह्या शब्दरूपाचें नसावें अशा कांहीं सूचना आल्या होत्या; व वरकरणी पाहणारांना त्या सयुक्तिक वाटत होत्या. परंतु कवि आणि चरित्रनायक यांचा परस्परांशीं शेवटपर्यंत असलेला जिव्हाळ्याचा संबंध ज्यांच्या निरीक्षणांतून सुटला नसेल, त्यांना हेंच नामाभिधान योग्य वाटेल. वत्याप्रमाणें तसें आम्हांस वाटल्यावरून तेंच कायम ठेवलें आहे.

जन्मकुलावरून हृदयाची उच्चनीचता ठरविणें अप्रशस्त होईल. चरित्रनायक अत्युच्च कुळांतील असले तरी परस्परांचीं भक्तिबंधनें एकजीवाचीं, हृदयमीलनाचीं होतीं. प्रस्तुत काव्य वाचतांच त्यांच्या अत्युत्कृष्ट प्रेमाची प्रचीति येईल.

कवीचा हा पहिलाच स्वतंत्र प्रयत्न कितपत यशस्वी आहे हें आम्हीं सांगण्यापेक्षां कवीचे गुरुजी कविवर्य "साधुदास" यांचा अभिप्राय पाहावा:—"You have really made an admirable progress. A little further study in the same direction and you will turn out a good poet. This book is, I can assure you, a success."

चाफळ
विजयादशमी
१८४१

सर्वांचा कृपाभिलाषी
दादासाहेब ऊर्फ
रामचंद्र गंगाधर स्वामी, चाफळकर.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणें.

श्रीराम समर्थ.

# माझा प्रिय मित्र

अर्थात्

## मित्र-प्रेम-रहस्य.

कवि- " यशवंत " चाफळ.

९७०२

प्रकाशकः-श्रीमंत दादासाहेब ऊर्फ रामचंद्र
गंगाधर स्वामी चाफळकर,
चाफळ, जि. सातारा.

मुद्रकः-अच्युत चिंतामण भट, यशवंत प्रेस;
३७ शनवार पेठ, पुणें.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. )

किंमत चार आणे.

## श्रीमंत बाबासाहेब ऊर्फ हनुमंत गंगाधर स्वामी महाराज.

संस्थान चाफळ

काव्य ५१२



# अर्पण-पत्रिका

( गीति )

'इंदू !' अज्ञ अजुनि तूं, सुखदुःखाची तुला न जाणीव,
माता सुखसंपत्ति, प्रिय अन्य न; तव तिच्याकडे धांव १
पतिनिधनें शोकाब्धीमाजीं खाता गटंगळ्या माता,
तूं मूढचित्त होशी, गूढ तुला जाणवें न तें आतां, २
तात कशाचा, कैचा मृत्यू हा, विश्व काय हें दिसतें;
शीतोष्ण, वायु, सोनें, तांबें, सर्वहि अभिन्न तुज गमतें ३
कालवशें होशिल परि जेव्हां तूं जाणती तदा घाया
त्वत्तात-कल्पना ही कृति उपयोगी पडेल त्या समया ४
यास्तव तव ताताचा प्रियतम मी मित्र अर्पितों तुजला,
पंचप्राणांसम निज ठेवी तूं जतन करुनि ह्या कृतिला ५

— यशवंत.

# प्रास्ताविक प्रार्थना.

( स्रग्धरा. )

अश्रूंनो, प्रार्थितों कीं, क्षणभरिं गतिला आपुल्या थांबवा हो !
कांहीं कालान्तरानें द्रुतगति सरिता निर्मला नित्य वाहो;
सन्मित्राच्या गुणांचें स्मरण घडतसें मोहिलें वा जयांनीं
देतें तें ताप आजीं, सकलहि परि तें ठेवितों रंगवोनी. ॥ १ ॥

(चाल—पोवाड्याची. )

प्रेमविचारीं दंग होउनी कालव्यय करणें
प्रिय बहु मजला, प्रेमीं पावे सार्थकता जगणें;
ज्या प्रेमानें चटका हृदया लावुनि ठेवियला,
तयास गातों, जरी असंमत तें मार्मिक सुधिला;
" बुद्धि-ज्ञानें सोडुनि दिधलें; प्रेमाधीन कवी "
तत्वज्ञांची जिव्हा त्यांना असेंच हो ! वदवी;
अरसिक तात्विक तया विनवि मी " पृथ्वी ही तुमची,
पृथ्वी-विरहित सृष्टि असें जी ती आहे कविची॥२॥

——— ॰°॰ ———

श्री. कविवर्य १२

# अल्प चरित्र.

॥ गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ॥

## दुःखिताचे प्रलाप.

वाचक हो!

पृथ्वीच्या पाठीवर परमेश्वराचे प्रिय पुत्र फार दिवस नांदलेले दिसून येत नाहींत! जगज्जनक अनंताच्या अगाध आणि अज्ञात शक्तीचें अस्तित्व जगांत आहे, अशी पामरांना प्रचीती देण्याकरितांच कीं काय, परमेश्वरी शक्तीचे परिमाणु एकाद्या पूर्वजन्मीच्या पुण्यवान् पुरुषाच्या दुर्मिळ व दिव्य देहांत प्रेरित करून विधात्यानें त्यांना पृथ्वीवर अल्प काळच पाठवून, परिजनांच्या हृदयाला चरका बसविण्याचा क्रम ठेवला आहे असें वाटतें! ज्यांना ज्यांना ह्या चरित्रनायकाच्या-दुःखिताच्या प्रलापाला विषयीभूत झालेल्या प्रियमित्राच्या—श्रीमंत बाबासाहेब ऊर्फ हनुमंत गंगाधर स्वामी यांच्या सान्निध्यांत थोडासा तरी काळ घालविण्याचें श्रेय सांपडलें आहे, त्यांना त्यांना ह्या माझ्या म्हणण्याची सत्यता दिसून येईल.

* * *

"धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे" हे भगवंताचे बोल खरे करण्याकरितां महाराष्ट्राच्या महदरिष्टाच्या काळांत दास्यत्वांत दिवस ढकलणाऱ्या, दारुण दुःखव्यास व दीन महाराष्ट्रीयांच्या हृदयांत आशेचा व ज्ञानाचा दीप पेटवून, त्यांच्या

मनांत व शरिरांत कर्तव्यतत्परता व स्वधर्मसंस्थापनोद्युक्तता बाणविणारा राष्ट्रीय साधुपुरुष श्रीसमर्थ रामदासस्वामी व त्यांच्या कार्यपरीघाचें केंद्र चाफळ हें ज्याला ठाऊक नाहीं असा खरा मनुष्य ह्या महाराष्ट्रांतच काय, पण ह्या भारतभूमींतही असूं शकणार नाहीं. अशा सुविख्यात चाफळ क्षेत्रांतील समर्थांच्या गादीवरील हल्लींचे पुरुष श्रीमंत बापूसाहेब ऊर्फ गंगाधर लक्ष्मण स्वामी याचे ज्येष्ठ चिरंजीव हेच आज माझे दिवंगत मित्र होत. हाय! 'दिवंगत' हें विषारी विशेषण मित्राच्या नांवाला लावतांना कवीची लेखणी आणि त्या लेखणीला प्रवृत्त करणारें हृदय कसें थरारत असेल, कसें हेलकावे खात असेल, कसें विद्ध झालें असेल, हें अनुभवाशिवाय अजमावतां येणार नाहीं. शब्दसृष्टि ही हृदयाचे व्यापार व्यक्त करण्याचें साधन होय. पण आनंद, दुःख, ममता, प्रेम इत्यादि ज्या भावना आहेत त्या बोलून दाखविण्यानें त्यांचें हृदयस्थ स्वरूप आविष्कृत झालें असें होत नाहीं. ऊन म्हणजें मूर्तिमंत सूर्य नव्हे, ज्योत्स्ना म्हणजे चंद्र नव्हे; त्याप्रमाणें उपरोक्त भावना प्रदर्शित करणारे शब्द म्हणजे त्या भावना नव्हत. त्या भावनांची छाया म्हणजे हे शब्द होत. त्यांचें प्रतिबिंब म्हणजे हे शब्द होत. अश्रुस्खलन, रुदन, वक्षस्ताडन इत्यादि अभिनय हृदयांतील कालवाकालवीचे एकशतांश द्योतक चित्रपट होत. ज्यांना असला दुःखद प्रसंग पाहण्याचें दुर्दैव प्राप्त झालें असेल त्यांनीं तत्स्मृति करावी म्हणजे प्रस्तुत कवीच्या शतधा विदीर्ण

झालेल्या हृदयाची कल्पना करतां येईल. असो! दुःख हें दुःख असलें, दुःख हें कोमल हृदयाला जाळून टाकणारे अग्निस्फुलिंग असले, जरी ते कटुतम असले तरी कर्तव्य म्हणून—कठोर कर्तव्य म्हणून हें काम तडीस न्यावें लागत आहे.

* * *

माझ्या मित्राचा जन्म शके १८१६ फाल्गुन वद्य १३ स झाला. ह्यांच्या पाठीवर दोन सख्खे लहान बंधु झाल्यावर यांच्या मातोश्री साजऱ्या हातांनीं सौभाग्य लुटीत स्वर्गाला गेल्या! अर्भकावर मातृनिधनाचा प्रसंग म्हणजे काळाच्या कठोर कुठारीचा आघातच होय! ह्या आघातानें यांना लहानपणींच मातृप्रेमाच्या पांघरुणाला आंचवावें लागलें!

* * *

ह्यांचें प्राथमिक शिक्षण चाफळ येथेंच इयत्ता ६ वी पर्यंत झालें. पुढें यांना हैद्राबाद ( डेक्कन ) ला आपल्या आयुष्यांतील बराचसा भाग घालवावा लागल्यामुळें त्यांना चांगलें ऊर्दू लिहितां वांचतां येणें भाग होतें आणि त्याप्रमाणें येतही होतें. ह्यांना लहानपणापासूनच चित्र कलेचा नाद होता व तो त्यांनीं थर्ड ग्रेड आर्ट एक्झॅमिनेशन उत्तीर्ण होऊन पूर्णतेला नेला. याशिवाय हल्लींची राजभाषा इंग्लिश मॅट्रिकपर्यंत संपादिली होती. ‘ अ, ब, क, ड ’ इत्यादि अक्षरांची दावण नांवाला लावून घेण्यांत भूषण न मानतां, सद्यःस्थितीचें आकलन होण्याकरितां इतकें शिक्षण बस्स आहे असें यांचें मत होतें. मात्र आपल्या

कुलाच्या वृत्तीला, पेशाला आणि सांप्रदायाला ऊर्जितावस्थेला आणण्यासाठीं ज्या शिक्षणाची जरूरी होती तें संपादन करण्यांत यांनीं मुळींच कसूर केली नव्हती ?

*　　*　　*

यांचा विवाह राजा रायरायांबहादुर कै श्री. लक्ष्मणराजा यांची कन्या व शामराव राजा यांच्या द्वितीय भगिनी बाइराजा ऊर्फ ललिता अंबाबाई यांच्याशीं शके १८३० आषाढ शुा. ११ रोजीं पुणें मुक्कामीं झाला. बाईराजा यांचे सासरचें नांव अन्नपूर्णाबाई असें ठेवण्यांत आलें होतें. तरी त्यांना माहेरच्या नांवानेंच संबोधण्यांत येत असे. त्या बिचारीवर आज असा खडतर प्रसंग ओढवलेला पाहून आप्तजनांच्या हृदयाला किती पिळ पडत असेल ! अरेरे ! हे अधमाधम काळा, तिच्या जीविताचा सौख्यचंद्र आणि सौख्यचंद्राचें जीवित तूं हरण केलेंस ! तिच्या आशेचे मनोरथ आणि मनोरथाच्या साफल्याच्या आशा आज तूं समूळ नाहींशा केल्यास ? तिचें सौभाग्याचें कपाळ आणि कपाळाचें सौभाग्य लुटून नेलेंस ! आज तिला हें जग सूर्यचंद्रप्रकाशमंडित असूनही अंधकारमय भासविणारा तूंच ! तिला आप्तेष्ट असूनही सर्वत्र निर्जनता वाटाविणारा वज्रहृदयी तूंच ! तिचे श्वासोच्छ्वास चालत असूनही तिला मेल्याप्रमाणें जाणविणारा सर्वभक्षक तूंच ! काय हें तुझें क्रौर्य ! हाय ! हाय ! ! हाय ! !

*　　*　　*

इंदिरे ! बोबडे बोल बोलून मुक्या मनालाही मोकळेपणानें

बोलावयास लावणारे इंदिरे! जगांतील दोनच उन्हाळ्यांची प्रखरता अनुभवल्यावर पितृनिधनाच्या असह्य आणि अखंड प्रखरतेंत पोळून जाणारे इंदिरे! तूं आपल्या अश्रु ढाळीत असलेल्या अभागी आईचें कसें सांत्वन करणार?

* * * *

श्रीमंत आबासाहेब, आपल्या बंधूचें अनुकरण करण्यास तुम्हांस आर्जवानें सांगण्याचें कारण नाहींच. तरी पण आतां युवराजपदाची जबाबदारी तुमच्यावर पडली आहे. श्रीसमर्थांनीं आपल्या पवित्र वास्तव्यानें आणि श्रीरामपंचायतनस्थापनेनें चाफळक्षेत्रास जें शुचिपण साधून दिलें, तें आज इतक्या अवधीनें मलिन होऊं लागलेलें पाहून तुमच्या बंधूच्या हृदयाला चरका बसला होता. व अशी स्थिति येण्याला कारण जबाबदार व्यक्तीमध्यें दिसून येणारा कर्तव्याचरणाच्या कळकळीचा अभाव रामदासी बाण्याच्या महतीबद्दल अज्ञान हेंच होय, असें ताडून "आपण कोणत्या स्थानीं उभे आहों, व ह्या स्थानावरून आपणाला किती लांब त्रिज्येचें वर्तुळ काढतां येईल" याचा अंदाज घेण्याचा उपक्रम तुमच्या बंधूनीं केला होता. स्वराज्यसंस्थापकाच्या राष्ट्रगुरूचा मान आपल्या गादीच्या उत्पादकाकडे होता हें आठवतांच त्यांना कळवळा येत होता; व योग्य काल येईपर्यंत त्याप्रीत्यर्थ पूर्व तयारी करण्यांत त्यांनीं आपली धूर्तता व कर्तव्यपालनाबद्दल उत्सुकता व्यक्त केली होती. पण आज ती तयारी जागच्या जागीं त्यांची त्यांच्याबरोबर पार लयास

२

गेली. त्यांची जबर महत्वाकांक्षा त्यांच्यासह इहलोक सोडून परलोकास चालती झाली. तरी आपल्या बंधूचें सद्वर्तन, सांप्रदायाचें पुनरुज्जीवन करण्याचें अगत्य, सर्वांबद्दल आदर व मनमिळाऊपणा हे गुण आतां तुम्ही अंगीकारून, त्यांच्या निधनानें आपोआपच शिरावर पडलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून, त्यांची महदाकांक्षा पूर्ण करण्यास झटलें पाहिजे; व झटाल अशी आशा आहे. परमेश्वर बुद्धिदाता व यशदाता आहे. पण मनुष्य कार्यकर्ता व विवेकसंपन्न असल्यामुळें तुम्ही आपल्या प्रयत्नांत कसूर करूं नये. गतकाळचें दुःख गिळून येणाऱ्या घडीला आनंदानें आव्हान करून असावें, यांतच पुरुषार्थ आहे.

चाफळ
विजयादशमी शके १८४१ } यशवंत दिनकर पेंढरकर.

— -— ० ———

काव्य ८९२

# श्रीमित्राय नमः*

(हरिणी.)

स्वकरं[1] विमल-स्पर्शें दिव्यें निशेप्रति[2] घालवी,
सुपथ मजला ज्याची तेजस्विता (ऽ) कृति[3] दाखवी,
मलिन कृति ज्या अक्षय्या त्या सदोदित वारितो
अनुगतिक मी भावें मित्रा[4] ! तुझा तुज वंदितों ॥ १ ॥

१००२

## १ सन्मित्र—याचना.

(शार्दूलविक्रीडित)

कोणी मेदिनि रत्न—हेम—मणि वा, सत्कीर्ति कोणी जनीं;
कोणी यौवनमंडिता सुललना इच्छी मनोमोहिनी,
आज्ञाधारक पुत्र इच्छिती, तशी कोणी सुता चांगली.
कोणी संगति साधुची; बहुविधा इच्छा अशा भूतलीं ॥ १ ॥
सन्मित्राविण शून्य हें जग दिसे, दीपाविना मंदिर.
रात्रींच्या समयीं जसें दिसतसें चंद्राविना अंबर;

---

१. स्व-कर = हात; (पक्षीं) आपले किरण. २. निशा = धुंदी; (पक्षीं) रात्र. ३. तेजस्विता कृती = तेजस्वी कृत्यें; (पक्षीं-अवग्रह धरून) तेजस्वित + आकृती = तेजस्वी देह. ४. मित्रा = सख्या ! (पक्षीं) सूर्या !

* प्रस्तुत नमन माझ्या प्रिय मित्राला व त्याचप्रमाणें श्लेषार्थानें श्रीसूर्यनारायणालाही केलें आहे.

दुर्दैवी नर तो जयास न असे सन्मित्र जाया, सुत,
ईशा ! मी म्हणुनी नतावनकरा ! त्वत्पादसेवारत. ॥ २ ॥
कांता सुंदर, मंद-हास्यवदना, आलापिनी मंजुल,
लज्जाभूषित, नम्रतायुत, तशी जी सर्वदा प्रेमळ,
नाथाराधन-मग्न, अप्रिय कधीं ठेवी न जी वर्तन,
झाली प्राप्त न यापरी तरिहि मी होईन दुःखार्त न ॥ ३ ॥
माता, बंधु, पिता तशी स्वभगिनी यांशीं धरी नम्रता,
जें सर्वप्रिय तें करी, न चुकुनी सोडी कधीं सत्पथा,
सत्याची धरि कास, येइ न कधीं मिथ्या मुखीं भाषण,
ऐसा पुत्र न लाभला तरिहि मी होईन दुःखार्त न ॥ ४ ॥
संसारीं रुसली जरी मजवरी पद्मालया चंचला,
दुर्दैवें मजभोंवतीं पसरिलें अत्युग्र दुःखानला,
किंवा एकवटूनि पांचहि महाभूतें जरी कोपलीं
त्यांची न क्षिति वाटणार मजला, नाहीं कधीं वाटली ॥ ५ ॥
आपद्ग्रस्त सखा बघोनि झटतो तद्भाग्य साधावया,
मित्राचें सुख तें गमे स्वसुख ज्या तो मित्र मागावया,
मित्र-प्रेम-सुधातृषा मम मनोभृंगाप्रती लागली
सर्वेशा, रघुनायका ! म्हणुनि मी काया पदीं वाहिली ॥ ६ ॥

———

## २. अभीष्ट-चिंतन

( शार्दूलविक्रीडित. )

आनंदोर्मि मनांत नित्य उठती ज्या मूर्तिला देखतां,
जाती दुस्सह वेदना स्मृतितुनी जें रूप हो ! चिंतितां;
ज्याचें देइ सहाय्य धीर मजला भोगावया आपदा
लाभे मित्र असा विभो ! म्हणुनिया मी वंदितों त्वत्पदा ॥१॥
चिंता-व्याप्त मला बघोनि चरके तात्काल जो मानसीं,
माझ्या हास्य मुखा बघोनि बनते संतोष वृत्ती तशी,
स्वप्राणासम ज्यास मी प्रिय असे, निःस्वार्थ जो वागतो
त्या मित्रास्तव ईश्वरा ! तव पदीं दीर्घायु मी मागतों ॥ २ ॥
कासारीं कमलावलीविण नसे रम्यत्व कांहीं जसें,
ऐश्वर्या उपभोगितां सुख मला ज्याच्याविना तें नसे;
ज्याच्यावांचुनि विश्व पूर्ण मजला भासेल हे शून्यसें,
त्या मित्रा सुखशांति दे प्रभुवरा ! प्रार्थी पदीं मी असें ॥३॥
ज्याच्या त्या हृदयासमान जगतीं प्रेमी दुजा आप्त न,
जो निष्काम, उदार, निर्मल सदा ठेवील सद्वर्तन,
क्लान्तांतःकरणास जो मम गमे विश्रांतिचा आसरा,
त्या मित्रावरि सर्वदा तव कृपादृष्टी असो ईश्वरा ! ॥ ४ ॥

( इंद्रवज्रा )

सर्वज्ञ विश्व त्रय-पालका ! रे !
भक्ताचिया निर्मल याचनेतें

तूं पूर्ण केलेंस दयांबु मेघा
आतांहि त्या ठेवि दयार्द्रतेतें ॥ ५ ॥

---

## ३ विरह-समय

( इंद्रवज्रा )

नेत्रांत अश्रू; तव खिन्न चर्या
कष्टी असें कां मन, मित्रवर्या ?
त्या सांग बा ! सत्वर कारणातें
मी त्यांचिया तत्पर वारणातें ॥१॥

*    *    *

( मंदाक्रान्ता )

हे सन्मित्रा ! विमल-हृदय-प्रेम-पीयूष-धारा-
वृष्टी केली मन-तनुवरी माझिया त्वां उदारा !
आतां माझ्या हृदय-कमलीं बा ? तुझा मूर्तिभृंग
मत्प्रेमाच्या मधुर सुरस-प्राशनीं होय दंग ॥ २ ॥
दुष्टासंगें कुपथ धरिला जेधवां मीं भ्रमानें
सन्मार्गातें कर धरुनिया लाविलें तूं श्रमानें,
आतां मातें सतत तिकडे कोण देईल साह्य
जातां तूतें त्यजुनि, गमतें जाहलों विश्वबाह्य ॥ ३ ॥
बा मित्रा ! तूं मजसि गमसी अंबरांतील मित्र,
जातां आतां त्यजुनि तुजसी सर्व भासेल रात्र,

सं.काव्य ५१२

कैसा साहूं विरह तव मी ? ह्यापुढें कोण मातें
प्रेमाच्या त्या मधुर वचनें धीर देई मनातें ? ॥ ४ ॥
पृथ्वीपृष्ठीं मजसि दिससी तूंचि मत्सौख्यसिंधु,
मत्श्रान्तांतःकरण-जलधी मानितो तूंचि इंदू,
सान्निध्याचा मधुतम कसा प्राप्त होईल बिंदू ?
दैवा दुष्टा ! किति तरि तुला हाय रे हाय ! निंदू ? ॥५॥
नेतें मातें निज बलमदें दैव आतां विदेशीं,
दुःख-व्याप्ता इथुनि निघतां मत्स्थिती होय कैशी ?
वाटे जावें, त्यजुनि सकलां, घ्यावया वन्यभोग
तूं मी संगें, मग न विरहा मृत्युवांचूनि मार्ग ॥ ६ ॥

* * *

( इंद्रवज्रा )

लागे तुला सोडुनि दूर जावें,
कर्तव्य तें कां म्हणुनि त्यजावें ?
तत्पालनें ये भव हा तराया,
जा; खेद मानी न मनांत राया ? ॥ ७ ॥
हें जीविताचें घनघोर युद्ध,
हो जावया त्यांत सदैव सिद्ध;
जाऊं नको गुंतुनि मोह पाशीं
हें योग्य नाहीं कधिं पौरुषासी ॥ ८ ॥
प्रेमाचिया शाश्वत बंधनानें
झालीं मनें बद्ध; न हों घनानें,

तीं एकमेकां न विसंबतील
देशीं विदेशीं जरि राहतील ॥ ९ ॥
घे आवरोनी निज बाष्पबिंदू,
कोणीहि दैवास नयेचि निंदू ;
सोडूं नये दुर्गम कर्म-मार्ग
येवो कितीही कटु दुःख-भोग ॥ १० ॥
होवो यशस्वी तव कार्य-भाग
येवो पुन्हां मंगल भेटि-योग
भक्तार्थ ठेवी करिं चापबाणा
चिंती मनीं तो रविवंशराणा ॥ ११ ॥

---

## ४ पत्रः—विरही निर्झर.

(चाल०—“ भला जन्म हा तुला लाधला०”)

एका स्थानीं उगम पावती तुंग हिमालय-शिरीं
विमल ते निर्झर दोघे जरी ॥
तया उपजतां काय ठाउकी होते विधिची कृती
कुटिल जो निष्ठुर ज्याची मति ॥
मदांध विधिनें निज-बलयोगें प्रस्तर ठेवुनि तिथें
करियलें भिन्न तया जोडितें ॥
हाय ! हाय ! त्या प्रेमल जीवां काय विभागुन तदा
मिळविला विधि वा ! तूं फायदा ? ॥

दोघे गेले दोन दिशांनीं शापदाणिची महा
तुजवरी करुनी वृष्टी पहा ॥
विरहीं त्यांना काय लोटुनी हर्ष जाहला तुला?
गमासि कीं विघ्नसुखी तूं मला ॥
तळमळती अंतरिं ते किति दिनयामिनी ।
हळहळती, भेटी इच्छिति दोघे मनीं ।
धडपडती मार्गीं गलितधैर्य होउनी ।
वज्र हृदय तव, येइल कैशी करुणा त्यांची तुला
ज्यांचिया प्रीतिस नाहीं तुला ॥ १ ॥
उंच उंच बहु कड्यावरुनि ते जाति धावुनी पुढें
प्रियसखा शोधित चोहींकडे ॥
घो घो घो घो ऐशा शब्दें हांका ते मारिती
जणुं गमे वनरोदन मांडिती ॥
खालीं येती परि न होतसे मीलन सखयासवें
म्हणुनियां गाळिति बहु आंसवें ॥
वृथा शोधुनी श्रांत होउनी मंद टाकिती पदें
निराशा निर्बलता फार दे ॥
विधिपुढती कोणि न टिकतो हें जाणुनी ।
जणुं गिळुनी दुःखा शांतिस धरिती मनीं ।
जणुं दिसती मग्नाचि ते जिवलग-चिंतनीं ।
उदास होउनि, दास होउनी कालाचे, हिंडती
परजगीं मीलन ते वांछिती ॥ २ ॥

---

## ५ प्रत्युत्तरः—निर्झरविहार.

(चाल—सदर.)

जसें तुझें मन, तुला भासतें विश्व सर्व हें तसें
प्रिय सख्या ! परि तें सत्यचि नसे; ॥
रोदन न व तें; दोघे करिती निर्झर बा ! गायना
बहुत जें देतें शोभा वना; ॥
कसे नाचती, किती खेळती, कसे धांवती पुढें
गणति ते स्वमनीं नच सांकडें ॥
कसा चंद्र ता नभीं आक्रमी मार्ग न कधिं थांबुनी
सकलही मेघांतें लंघुनी ॥
सदा प्रीतिचे गात गोडवे आनंदें विहरती,
उसासे विरहीं नच सोडिती ॥
दिनरजनीं स्वार्थत्यागातें दाविती ।
प्रेमाचीं सूत्रें सर्वांतें शिकविती ।
ईशाज्ञा पाळुनि अविरत ते वर्तती ।
पहा सृष्टिच्या गृहीं सकल जे कर्तव्यीं दक्षता
दाविती, ठेवुनि संतुष्टता ॥ १ ॥

(चाल-पाळण्याची.)

दुःखार्णव जगतीं सुख कमती, म्हणुनी घे या रीती ॥धृ०॥
प्रियतम सखया रे ! विरहानें व्याकुळ होउनि जाणें ॥
उचित न हें तुजला, मनिं कांहीं विवेक करुनी पाहीं; ॥

देसी तूं विधिसी दोषांसी, शोभे स्त्रीत्व न तुजसी ॥
निर्झर दोघे ते शापांतें देती नच दैवातें; ॥
रोदन नच करिती, तळमळती हृदयीं नच हळहळती; ॥
देती नच धैर्या सोडुनिया, उत्सुक पुढती जाया. ॥
करुं न शके विघ्न मन भग्न, जे कर्तव्यीं मग्न; ॥
कोणि नये त्यजितां मनसमता आपत्कालहि येतां. ॥
प्रसन्न ठेवाया निज हृदया सदैव घे श्रम सखया ॥ २ ॥

---

## ६ अतर्क्य काळलीला.

(इंद्रवंशा.)

जेथें नभा पर्वत उंच चुंबिती,
जेथें झरे मंद अमंद वाहती,
पुष्पें मरंदाप्रति जेथ गाळिती
नाना तऱ्हेच्या खगजाति नांदती ॥ १ ॥

जेथें धरी ताल सदा प्रभंजन,
जेथें करी कोकिल मंजु गायन,
मोदें पिसारा पसरूनि नाचुनी
सांगे शिखी तो हरिकीर्तना वनीं ॥ २ ॥

तेथें तरू थोर लहान प्रेक्षक
रंगूनिया डोलविती स्वमस्तक ॥
हो वाहवा! पक्षि मधून बोलती
होतात सारे रत ईशचिंतनीं ॥ ३ ॥

शोभे असें मंदिर सृष्टि-देविचें,
जें सत्य हो आलय सौख्यशांतिचें,
मैदान तेथें करण्यास निर्जल
लागे न काळाप्रति एकही पळ ॥ ४ ॥

विस्तारलासे अति भव्य सागर
ज्याच्याकडे सर्व जलौघ धांवती,
मासे जयाच्या उदरांत नक्रहि
नानापरीचे अगणीत राहती ॥ ५ ॥

जो राहतां शांत, तरंग खेळतां,
भासे जणूं हांसतसेच मंद तो,
कीं नाचवी तो निज हस्त-पल्लव,
किंवा गमे केश-कलाप हालतो ॥ ६ ॥

किंवा जशी यौवन-मंडिता रमा
भ्रू वांकवीते अपुली पुन्हः पुन्हां ॥
ते भासतीं कीं कुसुमें चमेलिचीं
सूर्यप्रकाशें खुलतात जेधवां ॥ ७ ॥

किंवा गमे कीं धनपादपंक्ति त्या
आकाशमार्गीं दिसतात ज्यापरी,
सौदामिनी वा करितात नर्तन,
येवोनिया विस्तृत सागरावरी ॥ ८ ॥

चित्त-प्रकोपें खवळे अतीशय
सर्वांप्रती दाखवितो महाभय ॥

जीवांप्रती पुष्कळ आसरा जरी
कोट्यावधी जीवहि भाक्षितो परी ॥ ९ ॥
लाटा महा त्या उडती किती तरी
भासे जणूं पर्वत उंच फेंकितो;
किंवा गमे तो जबडाच मृत्युचा,
कीं राक्षसाचा अवतार घेइ तो ॥ १० ॥
मेघांतुनी जें जल लाधलें असे,
तें द्यावयातें परतूनि त्याप्रती,
आयास घेतो परि सिद्धि येइ ना
घेई पुन्हां उंच उड्या नदीपती ॥ ११ ॥
रात्रंदिनीं यापरि ते परोपरी
सिंधू जिथें चालवि खेळ भीषण,
तेथें महा पर्वत घोर कानन
निर्मील हा काळ न लागतां क्षण ॥ १२ ॥
जेथें असे भव्य सुरम्य मंदिर,
भूपाल जेथें सुखरूप नांदतो,
दासी जयाची कमला खरोखर
जो सर्वदा सर्वहि सौख्य भोगितो ॥ १३ ॥
सेवेप्रती सादर दासदासिही
इच्छेपरी वर्तति कीं क्षणोक्षणीं;
सामंत तैसे बलवंत ज्यांचिया
लोटांगणें घालिति भीति पावुनी ॥ १४ ॥

शोभे असें मंदिर सृष्टि-देविचें,
जें सत्य हो आलय सौख्यशांतिचें,
मैदान तेथें करण्यास निर्जल
लागे न काळाप्रति एकही पळ ॥ ४ ॥
विस्तारलासे अति भव्य सागर
ज्याच्याकडे सर्व जलौघ धांवती,
मासे जयाच्या उदरांत नक्रहि
नानापरींचे अगणीत राहती ॥ ५ ॥
जो राहतां शांत, तरंग खेळतां,
भासे जणूं हांसतसेच मंद तो,
कीं नाचवी तो निज हस्त-पल्लव,
किंवा गमे केश-कलाप हालतो ॥ ६ ॥
किंवा जशी यौवन-मंडिता रमा
भ्रू वांकवीते अपुली पुन्हः पुन्हां ॥
ते भासतीं कीं कुसुमें चमेलिचीं
सूर्यप्रकाशें खुलतात जेधवां ॥ ७ ॥
किंवा गमे कीं घनपादपंक्ति त्या
आकाशमार्गीं दिसतात ज्यापरी,
सौदामिनी वा करितात नर्तन,
येवोनिया विस्तृत सागरावरी ॥ ८ ॥
चित्त-प्रकोपें खवळे अतीशय
सर्वांप्रती दाखवितो महाभय ॥

जीवांप्रती पुष्कळ आसरा जरी
कोट्यावधी जीवहि भक्षितो परी ॥ ९ ॥
लाटा महा त्या उडती किती तरी
भासे जणूं पर्वत उंच फेंकितो;
किंवा गमे तो जबडाच मृत्युचा,
कीं राक्षसाचा अवतार घेइ तो ॥ १० ॥
मेघांतुनी जें जल लाधलें असे,
तें द्यावयातें परतूनि त्याप्रती,
आयास घेतो परि सिद्धि येइ ना
घेई पुन्हां उंच उड्या नदीपती ॥ ११ ॥
रात्रंदिनीं यापरि ते परोपरी
सिंधू जिथें चालवि खेळ भीषण,
तेथें महा पर्वत घोर कानन
निर्मील हा काळ न लागतां क्षण ॥ १२ ॥
जेथें असे भव्य सुरम्य मंदिर,
भूपाल जेथें सुखरूप नांदतो,
दासी जयाची कमला खरोखर
जो सर्वदा सर्वहि सौख्य भोगितो ॥ १३ ॥
सेवेप्रती सादर दासदासिही
इच्छेपरी वर्तति कीं क्षणोक्षणीं;
सामंत तैसे बलवंत ज्याचिया
लोटांगणें घालिति भीति पावुनी ॥ १४ ॥

कर्तव्य-कर्मीं अति दक्ष सर्वदा
कांता सुता पुत्रहि सर्व सुंदर,
ज्याच्या सुखामाजिं उणें न कांहीं
भासे जणूं पृथ्विवरील ईश्वर ॥ १५ ॥
सिंहासनापासुनि ओढुनी तया
भिक्षापती त्यास करावया असे-
हा एकला काळ समर्थ भूतलीं
लीला तयाची अशि नित्य चालली ॥ १६ ॥
जें आपुलें वाटतसे, क्षणामधीं
घेऊन जाईल कुठें न सांगुनी
लावूं मुखातें जलपात्र आपण
टाकील तो तें अवचीत सांडुनी ॥ १७ ॥
झाला क्षुधापीडित जो तृषार्तही
देहावरी चिंधि न एक राहिली,
रस्त्यांत हस्ता पसरून मागतो-
" दीनास द्या पै तरि बाप माऊली " ॥ १८ ॥
ना रूप, नाहीं तनु संपदा जया
दुर्भाग्यसंपन्न अकिंचनाप्रती
हा काळ एका क्षणिं राज्य देइल;
माझी तयातें म्हणुनी नमस्कृती ॥ १९ ॥
काळाचिया काय मनीं न सांगवे,
कैशी उद्या दाखवितो परिस्थिति !

काळा ! तुझी शक्ति अतर्क्य मानवा
माझी तुला नित्य असो नमस्कृति ॥ २० ॥
वस्तु-स्थिती शाश्वत सारखी न ही,
प्रेमी मनें होतिल दूरदूरहीं,
देशान्तरानें कधिंही न केवल—
प्रेमामधें अंतर जाण होईल. ॥ २१ ॥

## ७ निधनवृत्त

(गीति.)

वार्ता कळतां वाटे कोसळलें गगन काय हें, हाय!
दुर्दैव-कोप-चापें सायक-संपात जाहला काय. ॥ १ ॥
वार्ता न, श्रवणीं ती अग्निज्वाला प्रवेशली वाटे,
ईश-क्षोभ-कुठारें किंवा मम हृदयपटल हें फाटे ॥ २ ॥
निज-जन-विघ्न-विनाशक करुणामय हे प्रभो! सिताकांत!
नेसी ‘हनुमंत’ पदीं, परि इकडे होय थोर आकांत ॥ ३ ॥
निष्ठुर झालासि कसा मजवरि तूं सदय विश्वपाळ हरी
दुर्भाग्य-तीव्र-तापें माझ्या तव आटली कृपा-लहरी ॥ ४ ॥
स्वपति-प्रिय-विरहित कृति स्वप्नीं देखील ना जिला ठावी
सहधर्मचारिणी ती सोडुनि का स्वर्गभूमि गांठावी? ॥ ५ ॥
‘इंदू’च्या शिशुलीला, मोहक बहु बोबडे मधुर बोल,
त्यजुनी गेलासि तुला मित्रा! लावूं किती तरी बोल? ॥६॥

मित्रा! अभिषेक तुला प्रेमजलें हृदयमंचकीं केला
सोडुनि गेलास मला, जो मी होतों सुसिद्ध हांकेला ॥ ७ ॥
कां लाजलास सुजना, लपलासी कां निजस्तुतिश्रवणें?
कां रुसलास मजवरी? रोष सख्यावरि नसे उचित धरणें ८
बालपणींच्या लीला स्मरुनी कां खेळसी लपंडाव?
त्वन्मूर्ति न दृष्टिपुढें, घाबरला म्हणुनि हा पहा जीव ॥ ९ ॥
खेळ पुरे, हाय! तुझा, झालों मी भीतचित्त बा सदया,
विकलस्थिति मम पाहुनि करुणा येई न कां तुझ्या हृदया?
कां जासी नंदनवन-सुख-मधु-रुचि-सेवनार्थ बा आधी?
सोडुनि मज गमन तुझें हृदया देतें असह्यशा आधी ॥११॥
आतां तो प्रेमाचा धीराचा शब्द माझिया श्रवणीं,
येइल कोठुनि पुढती? मूक गमे जाहली मला अवनी ॥१२॥
आतां मला पुन्हां ती मूर्ति मनोहर दिसेल कां जगतीं?
गेलेलें न दिसावें, हाय! किती ही कठोर विश्वगती! ॥१३॥
भावी चिर-सौख्याशा पाहुनि आयुर्दिनांस घालविलें
आजवरी, परि आतां निधनें नैराश्य पूर्ण काळविलें ॥ १४॥
लोपविलें हास्य तुझें, मृत्यूनें नेत्र-दीप मालविले,
थांबविलें शब्द तुझे, ज्यानीं मम हें शरीर डोलविलें ॥ १५
खालीं वरी सभोंवति एकांतीं जंव तशीच लोकांतीं,
निशिदिनिं नयनांपुढतीं दिसते तव दिव्य देहिंची कांती १६
निकट बोलतां कोणी वाटे स्वर कीं तुझाच तो आहे,
कोणी पद वाजवितां 'येशी तूं' कल्पना अशी वाहे ॥ १७ ॥

‘बाबासाहेब’ अशी कोणातें हांक मारुं या लोकीं?
सन्मित्रशून्य जगतीं कैसें रम्यत्व हाय ! मानूं कीं ? ॥ १८ ॥
हाय ! अकालीं झाला नष्टप्रभ ‘इंदु’चा[1] पिताराया,
स्वजना शोक-तमांतुनि शक्त असे कोण आज ताराया ॥१९॥
तूं घेतलास माझ्या भेटीचा ध्यास हें जधीं कळलें,
मन्नेत्रद्वय–जलधर अश्रू-रूपांत पूर्ण पाघळले ॥ २० ॥
“व्यर्थ कशाला जगलों मित्राची आस एक शेवटची–
पूर्ण कराया शक्त न झालों” हें शल्य नित्य मज डवची २१
हाय ! घडी अशिव किती होती ती जेधवां निरोपातें
घेउनि दूर जहालों, नव्हती ही कल्पना तदा मातें ॥ २२ ॥
तेव्हां हें कळतें जरि हस्त तुझे सोडिलेच मी नसते,
मत्प्रेमाच्या कवचीं झांकुनिया ठेविलें तुला असते ॥ २३ ॥
“‘यशवंता’[2] ! गेला कीं प्रियतम तव मित्रराज ‘हनुमंत’
राहुनि जिवंत हा मी, कैसा त्याचाचि जाहला अंत?” ॥२४॥
ऐसे गद्गद वच मज जातां येतां पिता तुझा वदतां
प्रत्युत्तर काय वदूं? नेत्रांतुनि निघति अश्रुच्या सरिता ॥२५॥

अ. क्र. 9602

१. हें मित्र-कन्येचें नांव. ‘इंदु’ ह्या शब्दाचा ‘चंद्र’ असा अर्थ घेऊन, चंद्राचा पिता म्हणजे ‘सूर्य’ असें धरिल्यास, ‘सूर्याला दुसरा शब्द ‘मित्र’ असा आहेच. म्हणून ‘इंदूचे वडील’ असा शब्दप्रयोग करूनही ‘माझा मित्र’ असा व्यंग्यार्थ दाखविला आहे. २ कवीचें नांव.

## ८ कालाची क्रूरता.

( शार्दूलविक्रीडित. )

क्षेत्रा जीवन द्यावयास गगनीं मेघावली पातली,
हर्षें नाचति मोर, चातक-मनें पाहूनि आनंदलीं;
झंझावात सुटोनि हाय ! परि ते फांकूनि गेले घन,
हे काला ! बघ जाहली किती तरी त्यांची निराशा घन ॥१॥
येतां आम्रतरूस मोहर नवा जाई गळोनी झणीं,
वृक्षा नूतन पालवी फुटत तों जाई वठोनी क्षणीं,
पक्षी जो उडणार तोंचि पडला निर्जीव भूमीवरीं,
काळा ! निष्ठुरता अशी तव करी संचार विश्वांतरीं ॥ २ ॥

( इंद्रवज्रा )

आला जलीं केलि करावयास
हंसीस घेऊनि सवेंचि हंस;
क्रीडावया लागत; तों तयाला
ओढूनि नेलें मकरें तळाला ॥ ३ ॥
कुंजावरी जें नव पुष्प, त्यास
लागे विकास-स्थिति यावयास
ज्यानें अहो ! शोभविलें वनाला,
तों कीटकें छेदियलें तयाला ॥ ४ ॥
रानीं नवा निर्झर मंजु नाद;
लागे कराया, बहु देइ मोद;

नं. ......... ता. .........

नाचेचि गार्नी वनदेवि वाटे,
ग्रीष्मेंचि तों शोषियलें तयातें ॥ ५ ॥
आला नर्भी चंद्र सुहास्य वक्त्री
ज्योत्स्नासुधा सिंचुनि ही धरित्री
लागे करायास नितांत शांत,
ग्रासीतसे राहु तया तशांत ॥ ६ ॥
चित्तास माझ्या गमला विसांवा,
जो सद्गुणें मन्मनिं कीं ठसावा,
नाहीं तुला पाहवला कसा बा?
काळा! कसा तो हरिसी कसाबा? ॥ ७ ॥
काळा! तुझी निष्ठुरता अशी ही
संचारिते नित्य दिशांत दाही
माया दया कां तुजला न कांहीं?
ठेवूनि बा! दृष्टि दयार्द्र पाहीं ॥ ८ ॥

---

## ९ स्वप्न-सृष्टि.

( शिखरिणी )

सदा स्वप्नीं येशी, बसुनि मजशीं गोष्टि वदशी,
कधीं भावी कार्या ठरवुनि मनीं, त्यास कथिशी,
मला संगें घेशी, सहल करण्या दूर निघशी,
कधीं मित्रा! देशी मधुर वदुनी धीर मजसी ॥ १ ॥

" सदा मैत्री राखूं " अभिवचन हें देशि सखया !
जरी स्वप्नीं, देई तरि अमित आनंद हृदया;
कधीं अंकीं माझ्या बसविशि सख्या ! आत्म-तनया
कधीं वादीं देशी त्वरितचि सुधी संमत नया ॥ २ ॥
कधीं कर्तव्याचे मजसि कथिशी मार्ग अगम,
कधीं सभ्यत्वाचे कथन करिशी सर्व नियम,
कधीं सायंकालीं गमन करुनी शैल-शिखरीं
जगत्सत्ताधारी समजुनि बसूं आपण वरी ॥ ३ ॥
वसंतीं सौंदर्यें बहुत खुलते सृष्टि ललना,
करीं मी तच्छोभाकथन रचुनी गोड कवना,
परंतू विश्वाची अघटित किती गूढ रचना,
जयाच्या आश्चर्यें अगतिक अशी होय कलना ॥ ४ ॥
कधीं काव्याची मी तुज मधुरता थोर शिकवी,
जिच्या वास्तव्यानें जग समजती स्वर्ग सु-कवी;
अशा त्या स्वप्नांचें सुख किति तरी सांगुं तुजला,
परी अंतीं स्वप्नें शर-सम हृदीं दुःखद मला ॥ ५ ॥

( इंद्रवज्रा )

वातायनांतूनि सुधाकराची
निद्रागृहीं निर्मल कांति साची
येते, तिला पाहुनि भास होतो—
एकांत हा साधुनि मित्र येतो ॥ १ ॥
ऐसा तुला कल्पुनि मित्रराया !

राहे उभा मी दृढ भेटि द्याया;
भूमीवरी हाय पडे तदा कीं,
यावें कसें तें करिं जें न लोकीं ? ॥ २ ॥
निःशब्द रात्रीं तरु-पल्लवातें,
वाचा फुटे मंजुळ मंद-वातें,
'सूं-सूं' असा तो ध्वनि आयकोनी,
झाला गमे मित्र निमग्न गानीं ॥ ३ ॥
शय्या त्वरेनें त्यजुनी उठावें,
शोधावया बा! तुजला फिरावें;
कोठें तिथें तूं परि ना दिसावें,
ऐशापरी मी कितिदां फसावें! ॥ ४ ॥
वृक्षांमधूनी विहगें उडावें,
रात्रीं ध्वनी ते श्रवणीं पडावे,
टाळी सख्या वाजविली तुवां ती,
ऐसे किती ते बहु भास होती ॥ ५ ॥

(शिखरिणी)

अशा रीतीं स्वप्नीं अनुभवित जें सौख्य पटतें,
पुन्हां निद्रा जातां स्मृतिस दिसती चित्र-पट ते ॥
समाधाना देती, स्मरणहि मना दुःखद जरी,
करावें वाटे कीं प्रिय गत-सुहृच्चिंतन तरी ॥ ६ ॥
कुठें मित्रा! आतां पुनरपि तुझी भेटि पडणें?
अगा पंचप्राणा! तुजविण गमे नीरस जिणें;

अकालीं गेलासी हृदय कुसुमा! केविं सुकुनी?
सुधेला प्रेमाच्या तव बघ बसे मीहि मुकुनी ॥ ७ ॥

---

## १० सृष्टीचें स्वप्न.

गीति

वृक्षांच्या जिव्हांनो! एकीमेकींत काय कुजबुजतां?
शंका स्पष्ट विचारा, मजपुढती काय हो तुम्ही बुजतां? १
सृष्टीच्या भाटांनो! गायन कां ठेविलें तुम्हीं बंद,
सोडूनि मौन बोला, लुप्त कसा जाहलाच आनंद? ॥ २ ॥
बनवासि देवतांनो! गेली तुमची सुकोनि मोहकता,
कैशी सर्वत्र दिसे वसलेली आज घोर भीषणता? ॥ ३ ॥
वायो! सुखद सुशीतल मंद गती जाहली तुझी नष्ट,
कां आज धांवशी तूं सैरावैरा मला कथी स्पष्ट? ॥ ४ ॥
तुमचा भाव उमगलों, माझ्या संगें सखा न मम आज,
सांगाया या वृत्ता वाटावी हो! किमर्थ मज लाज ॥ ५ ॥
वृक्षांनो! विहगांनो! वनदेवींनो! समीर-लहरींनो!
आलों मित्र न घेउनि, रुसला कां म्हणुनि पंचभूतांनो?॥६॥
वृक्षांनो स्तब्ध असा, विहगांनो एकचित्त व्हा क्षण कीं,
वनदेवींनो! या हो, पवना! होऊं नकोस अविवेकी ॥ ७ ॥
काय करावें सांगा दुर्बल-नर-शक्ति फोल मृत्युपुढें;
दुर्दैव कोपतां जन वैभव-संपन्न होतिही उघडे ॥ ८ ॥

मृत्यूनें जरि हरुनी मित्रश्रेष्ठास माझिया नेलें
अधिकारातिक्रम हें वर्तन त्यानें न खास हो ! केलें ॥ ९ ॥

---

## उपसंहार.

---

( शार्दूलविक्रीडित. )

माझें नाजुक जें अभेद्य परि जें अदृश्य हृन्मंदिर,
त्यामाजीं मन·मंचकीं बसविलें मित्रास त्या सुंदर,
प्रेमाच्या नव भूषणीं सजवुनी त्याला सवें घेउनी–
झालों. मी कधिं एकला न फिरतों, शांती धरा हो ! मनीं १०

---

समाप्त.

मराठी ... ग्रंथालय ठाणें
क्र. १५०२
ग्रंथ. शाखा.

REFBK-0001702
REFBK-0001702
ग्रं. क्र. १७०२

कवि "यशवंत" यांचें

लवकरच प्रसिद्ध होणारें.

दुसरें काव्य.

# "प्रतापाचें प्राणोत्क्रमण".

किंमत २ आणे.

मेवाडचा महाराणा प्रतापसिंह यांचे निधन यांत वर्णिलें असून तें काव्याभिज्ञांच्या हृदयाला पीळ पडल्याशिवाय राहणार नाहीं.

मिळण्याचें ठिकाणः — भा. रा. देशपांडे.
चाफळ ( सातारा. )